# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 192/2023 दिनांक : 15.05.2023

## 1)खुनाचा प्रयत्न करून जबरी चोरी :–

**विमानतळ** :–दिनांक 13.05.2023 रोजी चे 21.00 वा. चे सुमारास, **कृष्णा चौकाकडे जाणाऱ्या रोडने मुन्ना ठाकुरच्या घराच्या आलीकडे नांदेड येथे,** यातील अज्ञात आरोपीतांनी संगणमत करून यातील फिर्यादी व फिरोजखान ॲटो रिक्षा क्रमांक एमएच–26/बीडी–5861 मध्ये बसुन खडकपुराकडे जात असतांना महाराणा प्रताप चौक नांदेड येथे आल्यावर एक अनोळखी उंचीने मोठा असलेला वय अंदाजे 30 वर्षाचा व दुसरा काळा सावळा मध्यम बांध्याचा मुलगा वय 22 वर्षे दोघ्याच्याही डोक्याला परणा बांधलेला यांनी ॲटो आडवुन ॲटोमध्ये बसुन ॲटो कृष्णा चौकाकडे जाणाऱ्या रोडने घ्यायला लावुन ॲटोमध्ये दोघांनीही खंजर काढुन फिरोजखान यास दाखवुन व फिर्यादीस भिती घालुन ॲटो चालवायला लावले व मुन्ना ठाकुरच्या घराच्या आलीकडे आल्यावर फिरोजखान व ते दोन अनोळखी इसम झटापटीत ॲटोतुन बाहेर पडले तेंव्हा फिरोजखान यास उंचीने मोठा असलेल्या इसमाने पोटात व डाव्या हातावर खंजरने मारहाण करून खुन करण्याचा प्रयत्न केला. व दुसऱ्या काळया सावळया मध्यम बांध्याच्या इसमाने खिशातील 32,000/–रूपये व 8000/–रू चा रेडमी कंपणीचा मोबाईल असे एकुण 40,000/–रूपयाचा मुद्येमाल जबरीने चोरून नेले आहे. वगैरे **फिर्यादी शेरू उर्फ शेरा खुशालसिंह परमार, वय 35 वर्षे, व्यवसाय ॲटो चालविणे रा. सखोजीनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 167/2023 कलम 307, 397, 341, 34 भादवि सह कलम 4/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री जाधव, मो.नं. 9765902710** हे करीत आहेत.

## 2)टिनपत्रातील चोरी :–

**1)कंधार** :–दिनांक 13.05.2023 रोजी चे 02.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे टिनपत्राचे शेड मौ. वरवंट ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे टिणपत्राचे शेडमध्ये ठेवलेले साहित्य टिनपत्रे वाकवुन आत प्रवेश करून एक गॅस शेगडी व सिलेंडर ट्रॅक्टरचे दोन टायर व जुने पार्ट, जुने टिनपत्रे असा एकुण 27,000/–रूपयाचे साहित्य चोरून नेले. वगैरे **फिर्यादी चक्रधर पी. पंढरीनाथ वडजे, वय 63 वर्षे, व्यवसाय सेवानिवृत रा. वरवंट ता. कंधार जि. नांदेड,** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 139/2023 कलम 461, 380, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री इंद्राळे, मो.क्र. 9975754256** हे करीत आहेत.

## 3)विवाहीतेचा छळ :–

**1)शिवाजीनगर** :– दिनांक 30.05.2019 रोजी ते आज पावेतो, **रा. गोकुळनगर नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस माहेरहुन कुलर व चार चाकी न आणल्यामुळे शिवीगाळ व मारहाण करून शारिरीक व माणसीक छळ केला. वगैरे **फिर्यादी 32 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 146/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/43 पाटील, मो.क्रं. 8805013616** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड